# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०—२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०—२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/१८६ दिनांक — २/३/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये.

विषय — अपंग अधिनियम १९९५ च्या अंमलबजावणीबाबत
अपंग कर्मचा—यांना आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत.
संदर्भ — शासन पत्र क्र.संकीर्ण—२०११/(३६९/११)विशि—१, दि. २३/२/२०१२.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासनाने अपंगांचा अनुशेष भरण्याची कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी निर्देश दिलेले असून शासन निर्णयाच्या प्रती सर्व संबंधित महाविद्यालयांना कार्यवाहीसाठी यापूर्वीच पाठविण्यात आलेल्या आहेत. अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील अपंग अनुशेष भरण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती शासनास तातडीने सादर करावयाची असून सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे.

तरी अनुदानित महाविद्यालयांनी अपंग अनुशेष भरण्याबाबत व अपंग कर्मचा—यांना आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात त्वरित या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत — वरीलप्रमाणे

2/3/2012
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

**Table: -A**

## Information about backlog of persons with Disabilities (Direct Recruitment)

Name of College -

ID No

Date:

| Group | Cadre | Backlog as on 31.12.10 as reported by Dept. | | | | Post filled in Spl Drive i.e. after 01.01.2011 | | | | Posts yet to be filled | | | | Date of Advt. & No posts W.e.f. Col 4 | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | |
| 1 | 2 | 3 | | | | 4 | | | | 5 | | | | 6 | | | | 7 |
| A | **Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| B | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| C | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| D | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | | | | | | | | | | |

**Table :- B**

## Information about backlog of persons with Disabilities (Promotion)

Name of College -

ID No

Date: -

| Group | Cadre | Backlog as on 31.12.10 as reported by Dept. | | | | Post filled in Spl Drive i.e. after 01.01.2011 | | | | Posts yet to be filled | | | | Date of Advt. & No posts W.e.f. Col 4 | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | |
| 1 | 2 | 3 | | | | 4 | | | | 5 | | | | 6 | | | | 7 |
| C | Non-Teaching | | | | | | | | | | | | | | | | | |
| D | Non-Teaching | | | | | | | | | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | | | | | | | | | | |

Table: -C

## Information about Demand & Supply of Assistive Technical Devices to the Persons with Disability

Name of College -

ID No

Date: -

| Group | Cadre | No of Presently working official's with Disability | | | | No of official's who demanded devices | | | | No of official's who are supplied devices | | | | Total No of Official's who denied for devices | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind/ Low Vision | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | Blind | Ortho/Locomotive/ Cerebral palsy | Deaf & Mute | Total | |
| 1 | 2 | 3 | | | | 4 | | | | 5 | | | | 6 | | | | 7 |
| A | **Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| B | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| C | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| D | **Non-Teaching** | | | | | | | | | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | | | | | | | | | | |

# अपंग कर्मचा-यांना आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील माहिती

महाविद्यालयाचे नांव -

आयडी नं. -

| अ क्र | गट | गट अ क्र | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | कार्यालयाचे नांव | अपंगत्वाचा प्रकार | अपंगत्वाची टक्केवारी | कर्मचा-याने उपकरणाची मागणी नोंदविली (आहे किंवा नाही) | मागणी नोंदविली असल्यास मागणीचा दिनांक | मागणी केलेल्या उपकरणाचे नाव | उपकरणाचा पुरवठा केला आहे किंवा नाही | पुरवठा केला असल्यास त्याचा दिनांक | पुरवठा केला नसल्यास त्याबाबतची कारणमिमांसा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

रिट याचिका क्रमांक ३२९४/२०१०
कु.निलिमा अनंत सुर्वे व इतर जनहित याचिका
विरुध्द महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक-अपंग-२०११/प्र.क्र.९१/अ.क्र.२
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १४ फेब्रुवारी,२०१२

वाचा :

१) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/ सुधार-३, दिनांक ३ जून,२०११

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-अपंग-२०११/प्र.क्र.९१/ सुधार-३, दिनांक २० जुलै,२०११

३) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/ सुधार-३, दिनांक२० ऑगस्ट,२०११

४) मा.मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, अ.शा.पत्र क्रमांक-न्यायाप्र-२०११/ प्र.क्र.९१/सुधार-३, दि. २६/८/२०११

परिपत्रक :

मा.उच्च न्यायालयामध्ये प्रदिर्घ काळापासून रिट याचिका क्रमांक ३२९४/२०१० (कु.निलिमा अनंत सुर्वे व इतर जनहित याचिका विरुध्द महाराष्ट्र शासन) या प्रकरणी सुनावणी सुरु आहे. या प्रकरणी प्रामुख्याने पुढील मुद्यावर विहित मुदतीत कार्यवाही व्हावी असे मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत :-

१) शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरुन काढणे.

२) शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणे यांचा पुरवठा करणे

२. उपरोक्त संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करावी अशा सूचना शासन स्तरावरुन वेळोवेळी सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्व विभागांकडून विहित मुदतीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. यासंदर्भात सर्व विभागांकडून केल्या जाणाऱ्या कार्यवाहीचा आढावा आयुक्त (अपंग कल्याण), सचिव (सामाजिक न्याय) तसेच मा.मुख्य सचिव महोदयांकडे नियमितपणे घेण्यात येत आहे.

३. या आढाव्याच्या वेळी असे दिसून आले आहे की, शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरण्यासंदर्भात विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जात आहे. तरी ही कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण केली जाईल याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राधिकाऱ्यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

४. या आढाव्याच्या वेळी असेही आढळून आले आहे की,शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना उपकरणे देण्यासंदर्भात या विभागाने स्वयंस्पष्ट निर्देश वेळोवेळी निर्गमित केले असूनही शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना उपकरणे पुरविण्यासंदर्भात

विविध [illegible] केलेल्या [illegible] उपस्थित [illegible] आहेत व त्यामुळे उपकरणे पुरविण्याची कार्यवाही प्रलंबित राहीली आहे.

५. यास्तव विभागांना अपंग कर्मचाऱ्यांना उपकरणे देण्यासंदर्भात अडचणी येणार नाहीत आणि ही कार्यवाही मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या विहित मुदतीत पूर्ण होवू शकेल या हेतुने विभागांकडून उपस्थित होत असलेल्या अडचणी/प्रश्न यासंदर्भात एक सर्वसाधारण स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

मुद्दा -१) शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांनी मागणी केलेल्या उपकरणे/तंत्रज्ञानासाठी निधी उपलब्ध नाही -

स्पष्टीकरण -मा.उच्च न्यायालयाने दि.१८/३/२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये संबंधित विभागांनी खर्चासाठी योग्य ती तरतूद अर्थसंकल्पात करावी असे नमूद आहे. त्यानुसार या विभागाकडून दि.३/६/२०११ रोजी अंध/क्षीणदृष्टी प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना तर दि.२०/७/२०११ अन्वये अस्थिव्यंग/मुकबधीर कर्मचाऱ्यांसाठी आदेश निर्गमित केले आहेत. त्यातील परिच्छेद ६ मध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे की, यासाठीचा खर्च भविष्याकरिता संबंधित विभागांनी आपल्या अर्थसंकल्पात योग्य ती तरतुद करुन घ्यावी. हे आदेश जून व जुलै,२०११ मधील आहेत. त्यानंतर एक पूर्ण अधिवेशन (डिसेंबर,२०११) झालेले आहे त्यामुळे प्रत्येक विभागाने आपल्या अर्थसंकल्पात योग्य ती तरतुद त्यावेळी करुन घेणे अपेक्षित होते. सबब, अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नाही हे कारण स्विकारार्ह उरत नाही.

मुद्दा - २) उपकरणांची किंमत आणि खरेदी करावयाची पध्दत -

स्पष्टीकरण - शासन निर्णय दि.३/६/२०११ अन्वये अंध/क्षीणदृष्टी प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पुरवावयाच्या सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यांची यादी, पुरवठादार व किंमत विहित करण्यात आली आहे. या किंमती सर्वसाधारण आहेत तर दि. २०/७/२०११ च्या शासन निर्णयान्वये अस्थिव्यंग /कर्णबधीर कर्मचाऱ्यांना पुरवावयाच्या उपकरणांची यादी व पुरवठादार विहित केले आहेत. या आदेशामध्ये किंमती विहित केलेल्या नाहीत. त्याचे कारण असे की, प्रत्येक अस्थिव्यंग/कर्णबधीर कर्मचाऱ्यांना लागणाऱ्या उपकरणाची मोजमापे /प्रमाण हे वेगवेगळे असते. त्यामुळे त्यांची ठोक किंमत विहित करता येत नाही. अपंग कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदारी विचारात घेवून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी या प्रमुख हेतुने कर्मचाऱ्यांना ही उपकरणे देणे अपेक्षित आहे. हे लक्षात घेवून प्रत्येक विभागांनी त्यांच्या कर्मचाऱ्याने नोंदविलेल्या मागणीनुसार योग्य त्या किंमतीचे आणि योग्य ते उपकरण खरेदी करुन देणे अपेक्षित आहे. यासाठी शासनाने विहित केलेल्या उपकरणांमध्ये वा त्यांच्या किंमतीमध्ये फरक पडणार असेल तर त्याबाबतही विभागांनी सारासार विचार करुन योग्य तो निर्णय त्यांचे स्तरावर घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडे संदर्भ करुन कालापव्यय करणे अपेक्षित नाही.

मुद्दा - ३) कोणती उपकरणे खरेदी करुन द्यावीत.

स्पष्टीकरण - मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यालय प्रमुखाने त्यांच्या आस्थापनेवरील अपंग कर्मचाऱ्यांना योग्य ती उपकरणे खरेदी करुन देणे अपेक्षित आहे. मात्र मध्यंतरी दि.२० ऑगस्ट,२०११ च्या शासन

[illegible] -१३

परिपत्रकानुसार अपंग कर्मचाऱ्यांनी स्वतः रु. ५०,०००/- पर्यंत दोन उपकरणांची खरेदी करावी व कार्यालय प्रमुखांनी त्याची भरपाई करावी असे निर्देश देण्यात आले होते. परंतु त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ही उपकरणे नियुक्ती प्राधिकाऱ्यांनीच खरेदी करुन द्यावीत अशा सूचना दि. २६ ऑगस्ट,२०११ रोजी मा.मुख्य सचिव यांचे स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे साहजिकच दि. २० ऑगस्ट,२०११ चे परिपत्रक निरर्थ ठरते. सबब, या संदर्भात सामाजिक न्याय विभागाकडे पुन्हा संदर्भ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

<u>मुद्दा - ४) Scooter with Adaption</u>

<u>स्पष्टीकरण -</u> मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीने निश्चित केलेल्या उपकरणांची यादी या विभागाच्या दि. २०/७/२०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या यादीमध्ये Scooter with Adaption या उपकरणाचा समावेश आहे. त्यामुळे अनेक अस्थिव्यंग प्रवर्गातील कर्मचाऱ्यांकडून या उपकरणाची मागणी केली जात आहे. अशी मागणी करताना कर्मचारी नवीन स्कुटरची मागणी करीत असल्यामुळे या उपकरणाची किंमत रु. ५०,०००/- पेक्षा अधिक होते. त्यामुळे विभागांना ही उपकरणे खरेदी करण्यास अडचण येत आहे. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वस्तुतः स्कुटर वुईथ ॲडप्शन च्या ऐवजी "Retrofit Wheel attachments for various two wheelers specially designed for the use of Physically Challenged People" असे अभिप्राय अपंग कल्याण आयुक्तालयाने दिलेले आहेत. परंतु ही दुरुस्ती मा.उच्च न्यायालयाकडून मान्य करुन घेतल्याशिवाय या यादीमध्ये बदल करणे सामाजिक विभागाला तुर्त शक्य नाही. त्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती करण्यात येत आहे. ज्यावेळी मा.उच्च न्यायालयाकडून यासंदर्भात अनुमती मिळेल त्यावेळी योग्य त्या सूचना सर्व विभागांना देण्यात येतील. त्यामुळे तोपर्यंत <u>विभागांनी Scooter with Adaption हे उपकरण पुरविण्याचा निर्णय स्थगित ठेवावा.</u>

<u>मुद्दा - ५) शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना किती मुदतीत उपकरणे पुरविणे आवश्यक आहे.</u>

<u>स्पष्टीकरण</u> - अ) यासंदर्भात नमूद करण्यात येते की, दि. २० ऑक्टोबर,२०११ रोजी पर्यंत ज्या अपंग कर्मचाऱ्यांनी उपकरणांची मागणी नोंदविली होती त्या कर्मचाऱ्यांना दि. २० जानेवारी,२०१२ पर्यंत उपकरणे पुरविणे आवश्यक होते.

ब) उर्वरित सर्व अपंग कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेल्या आधुनिक सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यांची माहिती दि. २० जानेवारी,२०१२ पर्यंत करुन देणे आवश्यक होते.

क) अशी माहिती करुन दिल्यानंतर त्या सर्व अपंग कर्मचाऱ्यांकडून दि. २० एप्रिल,२०१२ पर्यंत त्यांना हव्या असलेल्या उपकरणांची मागणी नोंदवुन घेणे आवश्यक आहे. तसेच जे कर्मचारी उपकरणांची मागणी करणार नाहीत त्यांचे लेखी नकार या मुदतीत नोंदवुन घेणे आवश्यक आहे.

ड) दि.२० एप्रिल,२०१२ पर्यंत नोंदविलेल्या मागणीप्रमाणे त्या सर्व अपंग कर्मचाऱ्यांना दि.२०जुलै,२०१२ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत उपकरणे पुरविणे बंधनकारक आहे.

ड) उपरोक्त वेळापत्रकानुसार कार्यवाही न केल्यास संबंधित कार्यालय प्रमुख हा अपंग अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन न केल्याबद्दल उचित शिक्षेस पात्र ठरेल याची कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे स्पष्टीकरणानंतरही विभागांना जर काही अडचणी उद्‌भवल्यास त्यांनी त्याबद्दल आयुक्त, अपंग कल्याण यांचेकडे स्पष्टीकरणासाठी संदर्भ करावा असे कळविण्यात येत आहे. अपंग अधिनियम,१९९५ च्या अंमलबजावणीसाठी आयुक्त, अपंग कल्याण हे सक्षम प्राधिकारी आहेत आणि अपंग अधिनियमातील तरतुदींचे अथवा न्यायालयाच्या अनुषंगिक निर्णयांचे अनुपालन न करणाऱ्या प्राधिकाऱ्यांविरुध्द दंडनीय कारवाई करण्याचे प्राधिकार त्यांना आहेत ही बाबसुध्दा सर्व विभागांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वाक्षरी)
(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, हुतात्मा चौक, मुंबई (पत्राने)
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व समन्वय अधिकारी, मंत्रालयीन विभाग.
सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण
सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
कक्ष अधिकारी (आस्था-१/आस्था-२)
निवड नस्ती (अ.क.२)

शासकीय / निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले / होणा-या मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान /उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- अपंग- २०११/ प्र.क्र.९१ / सुधार -३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० जुलै, २०११.

वाचा:- १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -२०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक १७ मार्च, २०११.
३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -२०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक ०३ जून, २०११.

शासन निर्णय:-

वरील अनुक्रमांक ३ येथील दिनांक ०३ जून, २०११ च्या शासन निर्णयान्वये शासकीय व निमशासकीय सेवेतील पूर्णत: अंध व क्षीणदृष्टी कर्मचाऱ्यांसाठी तसेच भविष्यात नियुक्त होणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेले सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणांच्या किंमतींची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर मुक-बधीर तसेच अस्थिव्यंग शासकीय /निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी तसेच भविष्यात नियुक्त होणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांसाठी सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय व निमशासकीय तसेच अनुदान प्राप्त संस्थंच्या आस्थापनेवर खुल्या प्रवर्गातून अथवा अपंगाच्या आरक्षित पदांवर नियुक्त झालेले व भविष्यात नियुक्त होणा-या मुक-बधीर तसेच अस्थिव्यंग अधिकारी / कर्मचारी यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडण्यासाठी सोबतच्या यादीतील आवश्यक असणारे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन दयावयाची आहेत. त्याबाबतची यादी पुरवठादारांच्या नावांसह सोबत जोडली आहे. सदर यादीतील उपकरणे संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.

३. शासन असे ही आदेश देत आहे की, संबंधित कर्मचाऱ्यास दोन पेक्षा जास्त नाही इतके सहायक तंत्रज्ञान उपकरणे विभागांनी मागणीनुसार शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र- १०.०८/ प्र. क्र. ७०/ २००८/विनियम दिनांक १५ मे २००९ मधील तरतुदीनुसार खरेदी करून उपलब्ध करुन दयावीत. यासाठी सर्व विभागांनी त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या अपंग कर्मचाऱ्यांकडून मागणी प्राप्त करुन घेऊन त्यानुसार उपकरणांचा पुरवठा करण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेली सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणाची यादी सर्वसमावेशक नसून त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल होण्याची शक्यता आहे. ही यादी २० जुलै, २०११ ते ३० जून

२०१२ पर्यंत वैध राहील. या यादीमध्ये काही बदल करावयाचा असेल किंवा त्यामध्ये काही उपकरणांचा नव्याने समावेश करावयाचा असेल तर, संबंधित विभागाने समर्थनात्मक कारणांसह सविस्तर प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सादर करावा. त्यावर विभागामार्फत गठित केलेल्या समितीच्या मान्यतेने निर्णय घेण्यात येईल.

५. वरीलप्रमाणे यादीनुसार खरेदी केलेल्या सहाय्यक तंत्रज्ञान व उपकारणांचा संपूर्ण तपशिल कर्मचाऱ्यांच्या नावांसह विभागांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास पाठवावा.

६. खरेदी करण्यात येणा-या सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणांसाठी येणा-या खर्चासाठी विहित कार्यपध्दतीनुसार संबंधित विभागाने आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पात उपलब्ध करुन घ्यावी.

७. सदर शासन निर्णय संबंधित मंत्रालयीन विभागाने आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, अनुदान प्राप्त संस्था यांना तातडीने पाठवावा व त्याप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहेत.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. २०११०७२५१६०८३२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दिनेश वाघमारे )
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव
मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई (पत्राने )
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी,जि.प.
कक्ष अधिकारी, आस्था-२, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग /विभागातील सर्व कार्यासने/ निवड नस्ती-सुधार-३.

एस–१२६४–१३।

## 1. Devices for Persons with Locomotor Disabilities.

A. All typed of Prosthetics and orthotic devices including Calipers, Artificial Limbs, Splints, Cervical Belts, Dorsal- Lumber Belts, LS Belt, Abdominal Belt etc.

B. Mobility devices including Tri-cycles, Motorized Tri-cycles, Wheel Chairs, Motorizes Wheel Chairs Crutches, Walkers, Walking Sticks, Rolators, Scooters with adaption.

C. Al types of Surgical Foot-wears

D. All Devices for Daily Living

## 2. Cerebral Palsy

A. CP Chair

B. Motorized CP Chair

C. Wheel Chair and Motorized Wheelchair

D. Special Device for daily living including Toilet Chair, Dining Chair

E. Special Hardware for operating the computer

F. Remote Equipment Operating Devices.

*Supplier's Name*

1. Helpers of the Handicapped, Nasheman, 235/13, Tarabai Park, Kolhapur.
2. Maharogi Sewa Samiti, Anandvan Tal.: Warora Dist.: Chandrapur
3. Mahatma Gandhi Sewa Sangh, Gandhi Bhavan, Samarth Nagar, Aurangabad.

## 3. Hearing Impaired

A. Various Types of Hearing Aids including Digital Hearing Aids, Behind the Ear Hearing Aids, Pocket Model of Hearing Aids.

B. Assistive and Alarming devices including devices for Hearing Aid Telephone, television, Door Bells, Time Alarm etc.

C. Communication Devices like Portable Speech Synthesizer

D. Computer Aided devices and software

*Supplier's Name:*

1. Arphi Electronics Private Limited,
   Prabhadevi Industrial Estate, Block No.5, Veer Savarkar Marg,
   Prabhadevi, Mumbai - 400025.

2. M/s Aparna Meditronics Private Limited, 203, Gulmohar Centre Point, Opp. W.N.C., Off Nagar Road, Pune 411004.

3. Elkon Private Limited,
   904, Majetic Chamber, (Majestic Shopping Centre), 144, Girgaon Road, Mumbai 400004.

4. Ali Yavar Jung National Institute for the Hearing Handicapped, Bandra Reclamation, Bandra (West), Mumbai 400050.

--------